
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा.
दा. क्र. : २४७४

BVBK-0402474

## अर्पण :

**चिमुकल्याशा मित्रमैत्रिणींनो -**

*बदकुताईच्या कॅककॅकच्या गोष्टी मी चार वर्षापूर्वीच लिहिल्या. तुम्ही फार लहान होता तेव्हा. या गोष्टी मी तुमच्यापैकी काही मुलांना सांगितल्यासुद्धा होत्या नि त्यांना त्या खूप आवडल्या होत्या. मग वाटल की या गोष्टी लिहून अन् छापूनच काढल्या, तर तुम्हा सर्वांनाच त्या मिळू शकतील. कारण मी स्वत: तुम्हाला त्या सांगायच्या म्हटलं, तर मला तुम्हा सर्वांची घरं कुठं माहीत आहेत ! या गोष्टी छापायची तयारी होत असताच आपल्या भारत सरकारच्या लोकांकडेही मी त्या पाठविल्या. म्हटल बघू या त्यांना देखील त्या आवडतात का ! अन् काय गंमत ! त्यांना सुद्धा त्या आवडल्या म्हणे ! हे कळल्यावर तर मी या गोष्टी चटकन छापायच्या ठरविल्या, कारण मोठ्या माणसांनी सुद्धा त्या वाचल्या आणि तुम्हाला अजून ' ' ल्याच नाहीत - हे बर का !*



*तुम्हा सर्वांनाच या गोष्टी आवडतील असे वाटून "बदकूताईचा कॅक कॅक" हे पुस्तक मी तुम्हालाच अर्पण करीत आहे.*

*सुमति पायगांवकर*

BVBK-0402474

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| कॅक् कॅक्ने चोर पकडला | १ |
| कोल्हीताईंची भाऊबीज | ६ |
| कॅक् आणि बोकोबा | १२ |




केंद्र शासन आणि राज्य शासन यांनी बक्षिसे देऊन गौरविलेली पुस्तके –

# बदकूताईचा कॅककॅक

सुमति पायगांवकर

अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७ नारायण पेठ,
पुणे ३०.


प्रकाशक :-
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी प्रकाशन
३१७, नारायण पेठ,
दै. प्रभात समोर, पुणे – ३०
फोन – ४४९५४१

©सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशन दिनांक :-
२६ जानेवारी १९८९ / २४ डिसेंबर १९८८

मुद्रक :-
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी प्रकाशन
३१७, नारायण पेठ,
दै. प्रभात समोर,
पुणे – ४११ ०३०
फोन – ४४९५४१

मूल्य – ८/- रु.



# कॅक् कॅक्ने चोर पकडला

एक होत्या बदकूताई.
त्यांना होती तीन पिले.
मोठ्या पिलाचे नाव पॅक् पॅक् होते.
मधल्या पिलाचे नाव कॅक् कॅक् होते.
धाकट्या पिलाचे नाव टॅक् टॅक् होते.
तिघेहि अभ्यास करायचे.
तिघेहि चांगले वागायचे.
तिघेहि दुसऱ्यांना मदत करायचे.
मोठा पॅक् पॅक् होता जरा गडबड्या.
धाकटा टॅक् टॅक् होता जरा बडबड्या.
पण मधला कॅक् कॅक् होता जरा रड्या.


पॅक् पॅक् आपले काम चटपट करी.
टॅक् टॅक् आपले काम चटपट करी.
पण कॅक् कॅक्ला ते चटपट येईचना.
पॅक् पॅक् सकाळी लवकर उठे.
टॅक् टॅक् सकाळी लवकर उठे.
पण कॅक् कॅक्ची झोप लवकर उघडेचना.
आई त्याला हाका मारी तेव्हाच तो उठे.
पॅक् पॅक् लवकर तोंड धूत असे.
टॅक् टॅक् लवकर तोंड धूत असे.
पण कॅक् कॅक्चे तोंड धुणे आटपेचना.
आई त्याला हाका मारी तेव्हाच ते आटपत असे.



पॅक् पॅक् आईबरोबर खाणे शोधी.
टॅक् टॅक् आईबरोबर खाणे शोधी.
पण कॅक् कॅक्ला कुठे खाणे सापडेचना.
आई त्याला खाणे दाखवी तेव्हाच ते सापडे.
पॅक् पॅक् आई बरोबर पोहायला शिके.
टॅक् टॅक् आई बरोबर पोहायला शिके.
कॅक् कॅक्ला भरभर पोहणे जमेचना.
आई त्याला हळू हळू बरोबर नेई तेव्हाच ते जमे.
पॅक् पॅक् घरी आल्या बरोबर शाळेचे कपडे करी.



टॅक् कॅक् घरी आल्या बरोबर शाळेचे कपडे करी.
कॅक् कॅक्ला त्याचे कपडे मिळेचनात.
आई त्याचे कपडे काढून देई तेव्हाच ते मिळत.
पॅक् पॅक् सारी पुस्तके पाकिटात भरी.
टॅक् टॅक् सारी पुस्तके पाकिटात भरी.
कॅक् कॅक्ला त्याची पुस्तके सापडेच्चनात.
आई त्याला शोधू लागे तेव्हाच ती सापडत.
कॅक् कॅक्च्या शाळेत पुष्कळ पिले होती.
मैनाताईंची मंजुळा होती.
पोपटीताईंचा राघू होता.




चिमणीताईंची चिऊ होती.
कावळीताईंची काऊ होती.
कोंबडीताईंचा लक् लक् होता.
कबुताईंचा घूं घूं होता.
ससुताईंची ससलू होती.
खाऊताईंची चिरीप होती.
हरणीताई त्यांना शिकवीत असत.
बकरीताई त्यांना शिकवीत असत.
मेंढीताई त्यांना शिकवीत असत.
हरणीताई साऱ्यांच्या मोठ्या बाई होत्या.
डुकरीताईंचा डुकरू कधी शाळेत जाईना.

मनीताईंची मॅव मॅव कधी शाळेत जाईना
कोल्हीताईंचा कुई पण कधी शाळेत जाईना.
ती पिले दिवसभर शेतात ऊनाडत असत.
एक दिवस मधली सुटी झाली.
सगळी पिले जेवायला गेली.
कॅक् कॅक् अजून वर्गातच होता.
खाली पडलेल्या वह्या गोळा करीत होता.
इतक्यात कोल्हीताईंचा कुई आत आला.
अगदी हळुच आत आला.
तो राघूच्या बाकाकडे गेला.
कुई राघूचे पाकीट घेऊन पळून जाणार होता.
इतक्यात कॅक् कॅक् ने कुईला पाहिले.
त्याने राघूच्या बाकावर उडी मारली.
झटदिशी कुईचा हात पकडला.
कुईचा हात आपल्या लांब चपट्या चोचीत
अगदी घट्ट पकडला.



कुई जोराने किंचाळू लागला –
कुईई........कुई ईई ई.......
कुई कुई कुई.
साऱ्यांनी कुईचा आवाज ऐकला.
बकरीताई तिथे धावत आल्या.
मेंढीताई तिथे धावत आल्या.
सगळी पिले पण धावत आली.
बकरीताईंनी कुईला पकडले.
मेंढीताईंनी कुईला पकडले.
तितक्यात हरणीताई पण आल्या.
मोठ्या बाई होत्याना त्या.
हरणीताईंनी कुईला विचारले,
"काय रे, कुई, राघूचे पाकीट पळवीत
होतास काय ?"
हरणीताईंनी कुईला शिक्षा केली.
कॅक् कॅक् ला शाबासकी दिली.
बकरीताईंनी कॅक् कॅक् पाठ थोपटली.
मेंढीताईंनी कॅक् कॅक् पाठ थोपटली.
साऱ्या पिलांनी कॅक् कॅक् पाठ थोपटली.




## कोल्हीताईची भाऊबीज

त्या दिवशी भाऊबीज होती.
बदकूताईला छान छान जेवण करायचे होते.
तिने बदकरावाना बाजारात जायला
सांगितले.
बदकराव पिशवी घेऊन बाजारात गेले.





कॅक् कॅक् पण त्यांच्या बरोबर बाजारात गेला.
बाजारात खूप गर्दी होती.
बदकराव लवकर लवकर चालत होते.
कॅक् कॅक् लवकर लवकर चालेचना.
गर्दीत बदकराव पुढे पुढे जाऊ लागले.
गर्दीत कॅक् कॅक् मागे मागे राहू लागला.
कॅक् कॅक् बराच मागे राहिला.
कोल्हीताई पण बाजारात आली होती.
तिने कॅक् कॅक् ला मागे राहिलेले पाहिले.
तिने कॅक् कॅक्ला पटकन ऊचलले.
चटकन आपल्या पिशवीत घालून ती बंद केली.






कॅक् कॅक् आतून ओरडू लागला.
त्याचे ओरडणे बदकरावांना ऐकू जाईना.
शेवटी कॅक् कॅक् स्वस्थ बसला.
तो एकसारखा विचार करू लागला –
आता काय करावे ?
इकडे बदकराव सारा बाजार फिरले.
त्यानी कॅक् कॅक्ला शोध शोध शोधले.
पण कॅक् कॅक् काही सापडेना.
काही वेळाने कोल्हीताई घरी पोहोचली.
कॅक् कॅक् पिशवीत गपचूप बसला होता.

कोल्हीताईने त्याला बाहेर काढले.
ती म्हणाली, " आधी तुझे नाव सांग."
कॅक् कॅक् म्हणाला, " माझे नाव कॅक् कॅक्."

कोल्हीताई पुढे बोलू लागली –
आज संध्याकाळी माझा भाऊ जेवायला येणार आहे.
त्याचे नाव लांडगेदादा.
आज आहे भाऊबीज.
मी तुला कापून तुझा रस्सा करणार आहे.
माझ्या भावाला तो वाढणार आहे.
मग मी त्याला ओवाळणार आहे.
जरीची साडी पटकावणार आहे.
थोडा वेळ तू मागच्या अंगणात खेळ.
माझे काम झाले की मी हाक मारीन.
मग गपचूप घरात ये म्हणजे मी तुझा रस्सा करीन.
अंगणाचे फाटक बंद आहे, जा खेळ आता.
कॅक् कॅक् मागच्या अंगणात निघून गेला.
कोल्हीताई फारच गडबडीत होती.
तिची आज भाऊबीज होती.
लांगडेदादा ओवाळणीला येणार होता.



जरीची साडी ओवाळणी देणार होता.
कोल्हीताईने घर साफसूफ केले.
सामान सुमान आवरून नीट लावले.
इकडे कॅक् मागच्या अंगणात बराच फिरला.
समोर त्याला एक रिकामे टोपले दिसले.
त्याने एक युक्ती केली.
ते टोपले ओढत ओढत लांब नेले.
थेट पुढच्या अंगणाच्या फाटका जवळ नेले.
तिथे ते आपल्या अंगावर उपडे पाडून घेतले.
टोपल्याखाली तो लपून बसला.
कोल्हीताईचे बरेच काम संपले.




अर्धा स्वयंपाक पण झाला.
ती मागच्या अंगणात गेली.
कॅक् कॅक्ला हाका मारू लागली.
कॅक् कॅक्ला काही सापडेना.
तिने खाच खळगे शोधले.
गटार, डबके सारे शोधले.
कॅक् कॅक् काही सापडला नाही.
रस्सा काही झाला नाही. .
फारसा वेळ पण राहिला नाही.
कोल्हीताईने साधे श्रीखंडच केले.
बाकीचे जेवण झटपट शिजवले.

इतक्यात पुढचे फाटक वाजले.
कोल्हीताईने फाटक उघडले.
लांडगेदादा दाराशी उभा होता.
कोल्हीताईचे लक्ष लांडगेदादाकडे होते.
कॅक् कॅक् टोपल्याखालून हळूच बाहेर पळाला.
कोल्हीताई एकदम ओरडली,
" अरे........मेल्या......"
कॅक् कॅक् तिथून धूम पळाला.
कोल्हीताई त्याच्या मागे पळाली.
जोरात पळाली–जोरात पळाली.
वाटेवर काही काटेरी झुडपे वाढली होती.
त्यांच्या लहानशा फटीतून कॅक् कॅक् पुढे पळाला.
धांवण्याच्या भरात कोल्हीताई पण फटीत शिरली.




ती फटीत अडकूनच बसली.
पुढे जाता येईना ..... मागे जाता येईना.
शेवटी कशीबशी निघाली.
तिच्या अंगाला खूप काटे बोचले.
सारे अंग खूप खरचटले.
सारे पातळ जागोजागी फाटले.
कोल्हीताई घरी परत निघाली.
बिचारीची आज भाऊबीज होती.
लांडगेदादा वाट पहात असेल असे तिला वाटले.
त्याला मधेच एकटे टाकून ती पळत सुटली होती.
एकटे टाकले म्हणून लांडगेदादा रागावला.
तो खूप खूप रागावला.
रागारागाने तो आपल्या घरी निघून गेला.
बिचारी कोल्हीताई.
कॅक् कॅक् तिची फजिती केली.
तिचा चमचमीत रस्सा बुडवला.
तिची जरीची साडी बुडवली.
आणि कोल्हीताईच्या साऱ्या अंगाला काटे मात्र बोचले.



कॅक् आणि बोकोबा

संध्याकाळ होत आली होती.
बदकूताईला भाजी आणायची होती.
भाजीचा मळा जवळच होता.
बदकूताई म्हणाली, " चलारे मुलांनो, भाजी आणू या "

सगळी पिले निघाली.
बदकूताई म्हणाली, " मुलांनो, लवकर
लवकर चालले पाहिजे."
उजेड असतानाच परत आले पाहिजे."
मळयात छान भाजी होती.
बदकूताईने खूप खूप भाजी घेतली.
सगळेजण भरभर परत यायला निघाले.
कॅक् कॅक् भरभर चालेचना- रड्याच तो.
घर जवळ आले. काळोख झाला.
बदकूताई पटकन घरात गेली.
पॅक् पॅक् नी टॅक् टॅक् पण घरात गेले.
कॅक् हळुहळु रेंगाळत येत होता.
त्याने सहज समोरच्या उंचवट्याकडे
पाहिले.
अरे बापरे, उंचवट्यावर बोकोबा.
हिरवे हिरवे डोळे-
मोठ्या मोठ्या मिशा.
बोकोबा कॅक् कॅक् म्हणाला,
"कॅक् कॅक् कॅक् कॅक् मॅव् मॅव् -
पोटात कावळे काव काव.
चल ये पटकन माझ्या जवळ- उगाच
कशाला धावपळ ?"
कॅक् कॅक् समजला की बोकोबा



आपल्याला खाणार.

त्याने एक युक्ती केली. तो म्हणाला–

" बोकोबा बोकोबा मी येतो जवळ,

पण मी सांगतो ते ऐका अंमळ.


माझे आणि टॅक् टॅक् भांडण झाले आहे.

त्याचे दूध आईने पातेलीत ठेवले आहे.

पातेलीतले सारे दूध प्या, मग मला जरूर खा."

बोकोबा म्हणाला, " मी दूध पिताना तू पळून गेलास तर ?"

कॅक् कॅक् म्हणाला, " पाहिजे तर



माझ्यावर पहारा करा.
मी या खिडकीत बसून राहातो."
बोकोबा म्हणाले, " हे छान झाले, दूध नि
कॅक् कॅक् दोन्ही मिळाले. "
बोकोबा खिडकीतून स्वयंपाकघरात आले.
कॅक् कॅक् तिथेच खिडकीत बसला.
समोरच दुधाची पातेली होती.
बदकूताई पलीकडे भाजी चिरीत बसली
होती.
बोकोबा हळुच आले. त्यांनी दूध प्यायला
सुरवात केली.
बदकूताईने मागे वळून पाहिले.

पहाते तो काय.
बोकोबा खुशाल दूध पीत आहेत.
बदकूताईने समोरचे लाटणे उचलले.
बोकोबाच्या अंगावर जोराने फेकले.
लाटणे बोकोबाच्या पाठीत दाणकन
आपटले.
बोकोबा ओरडतच तिथून पळाले.
खिडकीतून कसे बसे बाहेर पडले.
कॅक् कॅक्ला खूप हसू आले.
बोकोबा खूप चिडले.
रागारागात उंचवट्यावर येऊन बसले.
कॅक् कॅक् त्यांना लांबूनच हाक मारली.
"बोकोबा या, मला खायला या, अहो
लवकर या."
बोकोबा रागारागात म्हणाले, " गुर्रर मॅव्. "
ते ऐकून कॅक् कॅक् म्हणाला,
"बोकोबा, बोकोबा, मँव मँव,
पोटात कावळे काव काव.
पोठीत लाटणे धप्.
बोकोबा बसले गप्.
कॅक् कॅक् बसला दडून,
बोकोबा थकले रडून,
बोकोबाचे डोळे हिरवे गार.

रडून झाले चमकदार.
कावळे काही ऐकत नाहीत.
कॅक् कूकूराव तर सापडत नाहीत.
बोकोबा बोकोबा मॅंव मॅंव,
पोटात कावळे काव काव."
- नमस्ते -

*****



BVBK-0402474